विषय -कोविड - १९ चा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता
जिल्हा परिषद सातारा येथे ऑनलाईन अर्ज/निवेदने
स्विकृतीकरिता "ई-टपाल प्रणाली" ची अंमलबजावणी
करणेबाबत..

सातारा जिल्हा परिषद, सातारा
जा.क्र.आस्था-२(३)/परिपत्रक/कावि/९३७/२०२१
सामान्य प्रशासन विभाग
दिनांक- २५ मार्च २०२१.

परिपत्रक

या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, मागील काही दिवसांत कोविड -१९ रुग्णांमध्ये लक्षणीय वाढ होत असून कोविड - १९ च्या पार्श्वभूमीवर लावण्यात आलेले बहुतांश निर्बंध हटवण्यात आले असून मोठया प्रमाणात गर्दी होत असल्याचे निदर्शनास येत आहे. कोरोना विषाणूचा (COVID-19) प्रसार जिल्हयातील कार्यालयांमध्ये होवू नये तसेच जिल्हयातील येणारे अधिकारी/कर्मचारी व अभ्यागत यांना कोरोनाचा संसर्ग होवून त्याचा फैलाव होवू नये यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून सार्वजनिक वाहतुक व गर्दी कमी करणे आवश्यक आहे. तसेच अभ्यागतांना वेळ नाही दिला तर त्यातून गैरसमज व अनावश्यक वाद होवू शकतात.

सबब जिल्हा परिषदेमध्ये जास्त वेळ हा येणा-या अभ्यागतांना / नागरिकांना बोलण्यात / चर्चा करण्यात जात आहे. त्यामुळे प्रशासकीय कामकाजास वेळ कमी पडू शकतो . त्याचप्रमाणे नागरिकांनासुध्दा खूप दूरवरुन पैसा, वेळ खर्च करुन जिल्हा मुख्यायलयास यावे लागत आहे. त्यांचाही वेळ , पैसा वाचवणे आवश्यक आहे. तसेच नागरिक/अभ्यांगत हे जास्त अंतरावरुन येवून जर अधिकारी कार्यालयात हजर नसतील अथवा दौ-यावर व सभेला उपस्थित राहण्यासाठी गेले असतील तर नागरिक/अभ्यांगत यांना तो वेगळा मनस्ताप सहन करावा लागतो. या सर्व बाबींचा विचार करुन जिल्हा परिषद सातारा येथे तंत्रज्ञानाचा वापर करुन " ई- टपाल प्रणाली " चा वापर करणेची बाब प्रशासनाच्या विचाराधीन होती. जेणेकरुन प्रशासकीय कामकाज हे गतीमान होवून प्राप्त अर्ज, निवेदने, समस्या व मागणीचा निपटारा जलद गतीने करणे सोईचे ठरेल.

त्या अनुषंगाने कोव्हिड -१९ च्या पार्श्वभूमीवर अभ्यांगतांची / नागरिकांची संख्या कमी करण्यासाठी अर्ज, निवेदने, मागणी - सुचनापत्र इत्यादी सर्व ऑनलाईन करण्याबाबत निर्णय घेण्यात येत आहे.

प्रत्यक्ष कार्यवाही :-

१) अभ्यांगत/नागरिक, क्षेत्रीय कर्मचारी त्यांचे अर्ज अर्ज, निवेदने, मागणी - सुचनापत्र इत्यादी जिल्हा परिषदेच्या zpstretapal@gmail.com या ई- मेल आयडीवर ऑनलाईन सादर करु शकतील.
२) अर्जाचा तपशिल संक्षिप्तपणे नोंद करुन ती पाठवता येईल.
३) निवेदनकर्ते यांना त्यांचे नाव, मोबाईल क्रमांक इत्यादी तपशिल देणे बंधनकारक राहील.
४) शासन आदेशानुसार निनावी अर्जाची दखल घेतली जाणार नाही.

कार्यालयीन कार्यवाही :-

१) जिल्हा परिषदेच्या माहिती व तंत्रज्ञान कक्षामधून ( I. T. Cell ) अभ्यांगतांनी सादर केलेल्या अर्जाचे सनियंत्रण केले जाईल.
२) प्राप्त अर्ज दैनंदिन स्वरुपात I. T. Cell यांचेमार्फत संबंधित विभागाकडे पाठविली जातील.
३) संबंधित विभागाकडून त्या अर्जावर/निवेदनावर कार्यवाही करुन अपेक्षित उत्तर संबंधित अर्जदार/निवेदनकर्ते यांना दिले जाईल.
४) अर्जातील /निवेदनातील कार्याची व्याप्ती पाहून कार्यवाहीसाठी दिवस निश्चित केले जाईल.
५) प्रत्येक आठवडयाच्या दर सोमवारी खातेप्रमुखांच्या (HOD) आढावा बैठकीत याचा आढावा घेण्यात येईल.

नागरिकांना विनम्र आवाहन

जिल्हा परिषद मुख्यालयातील गर्दी कमी करुन प्रशासनास कामकाजासाठी पुरेसा वेळ देणे व कोरोनाच्या पार्श्वभूमीवर प्रादुर्भाव कमी करण्यासाठी अभ्यागत/नागरिक, लोकप्रतिनिधी, क्षेत्रीय अधिकारी/कर्मचारी यांनी " ई- टपाल प्रणालीचा " जास्तीत जास्त वापर करावा अशी विनंती करण्यात येत आहे.

विनय गौडा जी सी (भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
सातारा जिल्हा परिषद,सातारा

प्रति,

१) सर्व खातेप्रमुख,
सातारा जिल्हा परिषद,सातारा .........

२) गट विकास अधिकारी,
पंचायत समिती सर्व .......................

प्रत:- मा. अध्यक्ष /उपाध्यक्ष , जिल्हा परिषद सातारा यांना माहितीसाठी सविनय सादर.

प्रत:- मा. सभापती, विषय समिती, जि.प.सातारा यांना माहितीसाठी सविनय सादर.

प्रत:- अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. सातारा यांना माहितीसाठी.

प्रत:- सातारा जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीकरिता.

प्रत:- जिल्हा माहिती अधिकारी यांना माहितीसाठी व प्रसिध्दीकरिता.

प्रत:- I. T. Cell , जिल्हा परिषद सातारा यांना माहितीसाठी व प्रसिध्दीकरिता.